# परिशिष्टे

# परिशिष्ट १

## बॅ. पी. जी. पाटील : जीवनपट

| | | |
|---|---|---|
| १९२१—२५ | : | ३ जुलै, कवलापूर (सांगली) येथे जन्म. वडील प्राथमिक शिक्षक |
| १९३०—३१ | : | महात्मा गांधींचे नाव प्रथम ऐकले. स्वदेश चळवळ, प्रभात फेऱ्या इ. मध्ये भाग, सूतकताई व खादी वापरास प्रारंभ |
| १९३४ | : | कर्मवीर भाऊराव पाटील यांची कवलापुरास भेट |
| १९३४ | : | जून, कर्मवीरांनी सातारला नेऊन म्यु. शाळा नं. ३ मध्ये मराठी ७ व्या इयत्तेत नाव घातले |
| १९३५ | : | जून, व्ह.फा. परीक्षेत मुंबई इलाख्यातील दहा जिल्ह्यात पहिला क्रमांक |
| १९३५—४० | : | न्यू इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थी. इंग्रजी वक्तृत्व सभात सहभाग |
| १९४० | : | जून, मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रिक परीक्षेत सर्व विषयात डिस्टिंक्शन (७७%). इंग्रजी विषयात पुणे केंद्रात पहिले. संस्कृतचे राजरत्न माने—पाटील पारितोषिक |
| १९४० | : | जून, कर्मवीरांनी विलिंग्डन कॉलेज, सांगली येथे प्रा. व्ही. के. गोकाक यांचेकडे पाठविले |
| १९४२ | : | जून, इंटर आर्टस् परीक्षेत प्रथम वर्ग. इंग्रजी विषयात पहिले आल्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे Hughlings Prize मिळाले. |
| १९४२ | : | २३ सप्टेंबर, अन्य दोन मित्रांसमवेत 'चले जाव' चळवळीत भाग घेतल्याबद्दल अटक व येरवडा कारागृहाकडे रवानगी. |

| | | |
|---|---|---|
| १९४२–४३ | : | सप्टेंबर ते जानेवारी येरवड्यात स्थानबद्ध. जेष्ठ पुढाऱ्यांच्या बौद्धिकांचा लाभ. इंग्रजी वाङमयाचे सखोल वाचन. |
| १९४३ | : | २६ जानेवारीस कारागृहातून सुटका |
| १९४४ | : | जून, प्रा. गोकाकांनी राजीनामा दिल्यामुळे फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे दाखल. |
| १९४५ | : | जून, बी.ए. ची परीक्षा इंग्रजी ऑनर्स सहित उत्तीर्ण. आवश्यक इंग्रजी विषयात पहिले आल्याबद्दल मुंबई विद्यापीठाची Ellis Scholarship मिळाली.<br>मुंबई विद्यापीठ १८५७ मध्ये स्थापन झाले. गेल्या १३९ वर्षात ही दोन्ही बक्षिसे मिळविणारे एकूण ८ विद्यार्थी आहेत. बॅ. पी. जी. पाटील हे बहुजन समाजातील एकमेव विद्यार्थी आहेत. |
| १९४५ | : | २६ जुलै, महात्मा गांधी यांची पांचगणीस भेट घेतली व त्यांचा आशिर्वाद मिळविला. |
| १९४६ | : | १७ सप्टेंबर, बोटीने इंग्लंडला शिक्षणासाठी रवाना. |
| १९४६–५१ | : | ऑक्टोबर १९४६ ते सप्टेंबर १९५१ इंग्लंडमध्ये वास्तव्य. |
| १९४७–४९ | : | King's College London मध्ये बी.ए. चा अभ्यास |
| १९४६ | : | ऑक्टरेबर Lincoln's Inn मध्येनाव दाखल. |
| १९४६–४७ | : | बार–अॅट–लॉ चे काही पेपर्स संपविले. |
| १९५२ | : | मे, बार–अॅट–लॉ ची परीक्षा दिली |
| १९५२ | : | २३ जुलै, बॅरिस्टर झाल्याची केबल मिळाली. |
| १९५२ | : | जुलै, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे इंग्रजीचे ट्युटर म्हणून नेमणूक (पगार रू. १२०/–) |

| | | |
|---|---|---|
| १९५४ | : | जून, बॅ. व सौ. पाटील, पुणे विद्यापीठाची एम.ए. परीक्षा इंग्रजी(संपूर्ण) विषय घेवून द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण. श्री. पाटील यांना इंग्रजीत सर्वप्रथम आल्याबद्दल विद्यापीठाचे पारितोषिक. |
| १९५४—५७ | : | दोघेही छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे इंग्रजीचे व्याख्याते. |
| १९५७ | : | जून, छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्यपदी नेमणूक |
| १९५८—६३ | : | पुणे विद्यापीठ कार्यकारिणीवर काम. |
| १९५७—६४ | : | जून, छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य. |
| १९६४ | : | फेब्रुवारी, 'कर्मवीरोपनिषद्' हा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विषयीच्या आठवणींचा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. |
| १९६४ | : | (फेब्रुवारी ते मे) U.S.E.F.I. तर्फे आठ भारतीय व सहा नेपाळी प्राचार्यांसहित अमेरिकेचा शैक्षणिक दौरा केला. |
| १९६३—७४ | : | शिवाजी विद्यापीठ कार्यकारिणीवर तीन वेळा निवड. |
| १९६४—६७ | : | कराडच्या सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेजच्या प्राचार्यपदाची जबाबदारी. |
| १९६७ | : | जून, रयत शिक्षण संस्थेने कोल्हापुरात ताराराणी विद्यापीठाचे कीर्ति कॉलेजचे कायम स्वरूपात चालविण्यास विकत घेतले. तेथे प्राचार्यपदी नेमणूक. |
| १९६९ | : | ऑगस्ट, पुन्हा सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड येथे प्राचार्य. |
| १९७२ | : | जून, सातारला छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य |
| १९७४ | : | जानेवारी, रयत शिक्षण संस्थेच्या मानसेवी सचिव पदावर नेमणूक. |
| १९७५ | : | २० जानेवारी, शिवाजी विद्यापीठाचे दुसरे कुलगुरू म्हणून सूत्रे स्वीकारली. |

| | | |
|---|---|---|
| १९७५–७८ | : | कुलगुरू म्हणून काम पाहिले.<br>डिसेंबर, 'हा शब्द गंध फुलांचा' भाषणांचा संग्रह प्रकाशित (संपादक – रा. तु. भगत) |
| १९७८–७९ | : | २० नोव्हेंबर अखेर छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून काम पाहिले. याच काळात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या इंग्रजी चरित्राची २५०० पृष्ठे लिहून पूर्ण. |
| १९७९ | : | २१ नोव्हेंबर, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून नेमणूक. |
| १९७९–८३ | : | महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. |
| १९९५ | : | तात्यासाहेब मोहिते (रेठरेकर) पुरस्कार.<br>माधवराव धुमाळ पुरस्कार |
| २००१ | : | २३ डिसेंबर, चतुरंग प्रतिष्ठानचा 'जीवन गौरव' पुरस्कार |
| २००३ | : | १ जुलै २००३ रोजी निधन |

## परिशिष्ट २

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## सन्मान पत्र

बॅरिस्टर

श्री. पी. जी. पाटील रा. कवलापूर ता. मिरज यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामांत केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यांत येत आहे.

वसंत नाईक

मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य

सचिवालय
मुंबई
दिनांक १५-८-१९६७.

परिशिष्ट ३

# सातारा क्रांती प्रतिष्ठान, सातारा



कै. माधवराव धुमाळ

स्मृती पुरस्कार १९९५

**मा. बॅ. पी. जी. पाटील**

आपण शैक्षणिक क्षेत्रात

केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल

मा. प्रा. ग. प्र. प्रधान यांचे हस्ते अर्पण

दि. १४/११/९५


किरण माने
सचिव

सुभाषराव देशमुख
अध्यक्ष

**सातारा क्रांती प्रतिष्ठान, सातारा**

# परिशिष्ट ४

## बॅ. पी. जी. पाटील यांना दिलेला 'जीवन गौरव' पुरस्कार



॥ श्री ॥

आदरणीय बॅरिस्टर पी. जी. पाटील यांना, गेल्या पन्नास वर्षापासून शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात निरंतर कार्यरत असणारे ध्येयनिष्ठ, सेवाभावी, उदारमतवादी असे ज्ञानसंपन्न नेतृत्त्व आपल्या रूपाने महाराष्ट्राला लाभले आहे. विशुद्ध चारित्र्य, ज्ञानाची निरलस साधना, सेवेचा व शिक्षणाचा कर्तव्यभावनेने केलेला स्वीकार, तत्वनिष्ठा, ज्ञाननिष्ठा व समाजनिष्ठा यांना एकत्र गुंफण्याची अखंड धडपड यांनी आपली जीवनगाथा समृद्ध झाली आहे. आपण आपले सारे आयुष्य समाजाचे विविधांगाने शिक्षण करण्यासाठी वेचले आणि वेचत आहात. सर्वार्थाने आपण तळमळीचे समाजशिक्षक आहात. शिक्षक, स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारक अशा विविध भूमिकांतून हेच मोलाचे कार्य आपण करत आला आहात. गरिबीत जन्मलेल्या खेड्यातील मुलाने गुरू, ग्रंथ आणि गांधी या तीन दैवतांच्या आधारे घेतलेली झेप म्हणजे आपले कर्तृत्वशाली जीवन. असंख्य लोकांना ते आदर्शवत, मार्गदर्शक आणि प्रेरक आहे.

सांगली जिल्ह्यातील कवलापूर या छोट्याशा गावी आपला जन्म झाला. नियतीने आपल्या ओंजळीत दुर्दैवी पोरकेपण, कमालीचे दारिद्र्य आणि जीवघेणे एकलेपण याचे दान दिलेले असले तरी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या परिस्पर्शाने त्याचे सोने झाले. कर्मवीरांचे मायेचे आणि प्रोत्साहक मार्गदर्शन आणि आपली प्रखर बुद्धीमत्ता, जिद्द आणि कष्टाळूपणा आणि निष्ठा यांच्या बळावर आपण वाटचाल करत राहिलात. अडचणी असंख्य, आव्हाने अनेक आणि परिस्थिती बिकट अशी स्थिती असतानाही न डगमगता आपण यशस्वी मार्गक्रमण करीत आलात. आपण सांगली आणि पुण्यात महाविद्यालयीन शिक्षण केलेत. पदवी परिक्षेतही प्रतिष्ठीत अशी

पारितोषिके प्राप्त केलीत. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रेरणेतून व महात्मा गांधीचा आशीर्वाद घेऊन आपण परदेशगमन केलेत. कायद्याच्या परिक्षेतही उज्वल यश मिळविलेत. याच दरम्यानच्या काळात देशाच्या स्वातंत्र्याची हाक येताच पदवीचे शिक्षण अपुरे ठेवून आपण लढ्यात उडी घेतलीत. त्यामुळे आपणास काही काळ कारावासही भोगावा लागला. तेथेही थोरा—मोठ्या स्वातंत्र्ययोद्ध्यांच्या सहवासातून, प्रबोधनातून आपण ज्ञानसाधना चालूच ठेवलीत.

कर्मवीरांचा सहवास मार्गदर्शन आणि श्रमप्रतिष्ठा व स्वावलंबन यांना महत्त्व देणारे रयत शिक्षण संस्थेतील वातावरण यातून आपल्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण झाली. ती सामाजाभिमुख, ध्येयप्रवण आणि अशिक्षित, अडाणी समाजाविषयी कळवळा बाळगणारी व्हावी हे स्वभाविक होते. सामाजिक न्याय, समता आणि सार्वत्रिक शिक्षण प्रसार या मुल्यांवर अधिष्ठित अशी समाजाची रचना व्हावी हा ध्यास तेथेच आपला श्वास झाला. म्हणूनच एकीकडे शिक्षणासाठी झटताना दुसरीकडे आपल्या भोवतीच्या समाजातील अन्याय, अंधश्रद्धा, अपप्रवृत्ती यांच्यावर प्रहार करण्यासाठी आपण पुढे सरसावलात. यामुळे देवाच्या नावावर केली जाणारी पशूहत्या आपण ऐन तारूण्यात, प्रसंगी संघर्ष आणि प्रबोधन करून बंद केलीत. मानवी मुल्यांच्या प्रस्थापनेसाठी आपण आपल्याच समाजाच्या अघोरी पंरपरेविरूद्ध दंड थोपटलेत. यातून आपली समाजसुधारणेची आंच लक्षात येते. आपल्या पुर्वायुष्यातील कटू प्रसंग आपण उगाळत बसला नाहीत. मात्र तसे प्रसंग इतरांच्या वाट्याला येऊ नयेत यासाठी आपण झटत राहिलात.

रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये इंग्रजी विषयाचा प्राध्यापक म्हणून आपण आपल्या शैक्षणिक कार्याला प्रारंभ केलात. स्वाभाविकपणेच पुढील काळात योग्यता, कर्तृत्त्व आणि ध्येयवाद यामुळे शैक्षणिक क्षेत्रातील विविध पदावर काम करण्याची संधी आपणाला प्राप्त झाली. ट्युटर ते कुलगुरू असा आपण प्रवास केलात. शिवाय पुणे व शिवाजी विद्यापीठाच्या अनेक समित्या आणि उपसमित्यांमध्ये आपण मौलिक शैक्षणिक कार्य केलेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून १९७५ च्या जानेवारीत आपण सुत्रे हाती घेतलीत आणि त्याद्वारेही शिक्षण क्षेत्रात दूरगामी परीणाम करणारे काही चांगले निर्णय घेतलेत. नंतरच्या काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्षपद आपण भूषविलेत आणि आपल्या पारदर्शक कारभाराचा तेथेही ठसा उमटवला. ग्रामीण भागात, बहुजन समाजात शिक्षण प्रसार व्हावा, विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण कसदार आणि सुसंस्कारी असावे त्यासाठी ग्रामीण मुलांना भरपूर सवलती मिळाव्यात. समाजजीवनाच्या सर्वक्षेत्रात ग्रामीण तरूणांने

कर्तृत्त्व दाखवावे यासाठी आपण आयुष्यभर कळकळीने कार्य केलेत. शिक्षण, संस्कार आणि समाजन्नोती या तीन गोष्टींचा आपण पुरस्कार केलात, प्रचार केलात. नानाविध व्यासपीठावर हा विचार आपण मांडलात. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शिक्षणाची चतु:सुत्री आपण निष्ठेने प्रस्तृत केलीत. विद्यार्थी, पालक आणि विद्याकेंद्र यांच्यात एक नाते प्रस्थापित करण्याचा आपण सातत्याने प्रयत्न केलात. आपण विद्यार्थ्यांना केवळ औपचारीक शिक्षण दिले नाही तर त्यांना घडविण्याचे कार्य केलेत. वसतिगृहातल्या मुलांची बौद्धीके घेऊन त्यांच्यात सामाजिक बांधिलकी, जातिनिर्मुलन, श्रमप्रतिष्ठा यासारख्या गोष्टीचे संस्कार रूजविण्याचे प्रयत्न करणे हे याची साक्ष देणारे आहे. केवळ पुस्तकी ज्ञान आपल्याला कधीच भावले नाहीत. भूमी आणि शिक्षण याचे नवे नाते प्रस्थापित करण्यावरही आपण भर दिलात. महाराष्ट्रातील पश्चिम माळरानावर आज उभे राहीलेले भरघोस शैक्षणिक पीक निर्माण करण्यातील आपला वाटा विसरता येण्यासारखा नाही.

सेवा, चारित्र्य, स्वदेश प्रीती, त्याग, ध्येयनिष्ठा यासारख्या जीवन मुल्यावर आपली अपार श्रद्धा असल्याने या मुल्याचे दर्शन घडविणाऱ्या महापुरूषाविषयी आपल्या मनात नितांत आदर आहे. तेच संस्कार विद्यार्थ्यांमध्ये आणि व्यापक पातळीवर समाजात रूजावेत म्हणून आपण अथक प्रयत्न केलेले आहेत. त्यातूनच रयत शिक्षण संस्थेत समाजसेवी शिक्षणाची एक फौजच निर्माण झाली. शिक्षण म्हणजे अक्षर ओळख वा पदवी नव्हे तर तत्व, सत्व आणि स्वत्व यांची ओळख करून देणारी तेजस्वी शक्ती याचा प्रत्यय आपल्या समर्पित व चारीत्र्य शुद्ध जीवनातून समाजाला आला आहे. आपल्या ज्ञान संपन्नतेला अभिजात रसिकतेची जोड आहे आणि उत्तुंग कर्तृत्वाला विनयाचे कोंदण आहे. आपल्या सारख्या क्रियाशील ज्ञानोपासकाचे ज्ञानप्रसारकाचे कार्य पुढील पिढ्यांना प्रेरक आहे, मार्गदर्शक आहे. या कार्याबद्दल आमच्या मनात नितांत आदराची व कृतज्ञतेची भावना आहे.

म्हणून या वर्षाचा शैक्षणिक क्षेत्रातील जीवन गौरव पुरस्कार आपल्याला अर्पण करताना आम्हाला अतीव आनंद होत आहे.

रंगसंमेलन
२००१

आपले नम्र

चतुरंग

**'चतुरंग प्रतिष्ठान'**

आणि **'जीवन गौरव पुरस्कार'** निवड समिती

२३ डिसेंबर २००१